# डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,विष्णुपूरी,नांदेड

DR. SHANKARRAO CHAVAN GOVT. MEDICAL COLLEGE AND HOSPITAL, VISHNUPURI, NANDED.

Dean Chember - (02462) 229275 Fax No. 02462 – 229336 E-mail ID :- "gmcnanded @ rediff mail.com."


जा.क्र.डॉशंचशावैमवरुविनां/आस्था-३/छात्रमानसयोजना/११ महीने/ 1178 /२०२४ दिनांक:- 09 / 12 /२०२४

## जाहिरात

विषय:-छात्रमानस योजनेंतर्गत छात्रमानस कक्ष सुरू करण्याकरिता, " मानसोपचार समुपदेशक " हे पद निव्वळ कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याकरिता मुलाखतीद्वारे भरणे बाबत.

संदर्भ :- : १.मा.आयुक्त,वैद्यकीय शिक्षण यांचे पत्र क्र.संवैशिवसं/मानसिक आरोग्य सबलीकरण/शै.वि-७,/२०२४/१३८५१,दि.२३.०९.२०२४

२.वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग यांचा शासन निर्णय क्र.कंत्राटी-०६२४/प्र.क्र.२३५/ प्रशा-२,दि.०८ ऑगस्ट २०२४

३. या कार्यालयाची मंजुर टिपणी दिनांक ०९.१२.२०२४.

या संस्थेच्या अधिनस्त डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वेद्यकीय महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानसिक सबलीकरणाकरिता छात्रमानस योजना राबविण्याकरिता छात्रमानस कक्ष सुरु करण्यासाठी दोन " मानसोपचार समुपदेशक " ही पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीवर निव्वळ ११ महिन्याकरिता एकत्रित प्रतिमाह ३०,०००/- रु. मानधनावर महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेच्या निधीमधून उपलब्ध अनुदानातून तात्पुरत्या स्वरुपात भरण्याकरिता योग्य त्या अर्हता प्राप्त उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. त्याकरिता खालीलप्रमाणे (walk-in-interview) जाहिरात देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | वय | पदसंख्या | मानधन |
|---|---|---|---|---|
| 1 | मानसोपचार सपुदेशक | ३८ वर्षे पेक्षा कमी | ०२ | रु.३०,०००/- प्रती माह (रुपये तिस हजार एकत्रित मानधन) |

सदरील पदे ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून ११ महीन्याच्या कालावधीकरिता भरण्यात येत आहेत.

1.मानसोपचार समुपदेशक पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता :-

1.1. एमएसडब्ल्यु / एम.ए.मानसशास्त्र / कौन्सिलिंग डिप्लोमा ( MSW/M.A. PSYCHOLOGY/ COUNSELLING DIPLOMA)

1.2. एम.एस.सीआयटी ( MS-CIT )

1.3. किमान एक वर्ष अनुभवी उमेदवारास प्राधान्य (1 Year Work Experience Preferred )

2. अर्ज करण्याबाबतचा तपशील .

| | | |
|---|---|---|
| १ | अर्ज करण्याचा कालावधी दिनांक | दिनांक ०९-१२-२०२४ ते १३-१२-२०२४ |
| २ | अर्जाची किंमत | रु.५००/- रोखपाल यांच्याकडे रोखीने पैसे भरुन पावती घेणे |
| ३ | अर्ज स्वीकारण्याची अंतीम तारीख व ठिकाण | दिनांक १३-१२-२०२४ रोजी सायंकाळी ०५.०० पर्यत अर्जा करिता भरण्यात आलेल्या शुल्काची मुळ पावती अर्जासोबत सादर करणे |
| ४ | मुळ कागदपत्रे तपासणी आणि मुलाखतीचा दिनांक व वेळ तसेच ठिकाण | दि. १७/१२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता.<br>ठिकाण :- मा.अधिष्ठाता यांचे दालन डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वेद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विष्णुपूरी, नांदेड. |

३. अर्ज मिळण्याचे ठिकाण :- आस्थापना-३,डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महा. व रुग्णालय, विष्णुपुरी, नांदेड

४. पद संख्या ऐनवेळी बदलू शकेल. हि पदे निव्वळ कंत्राटी असून शासकीय नाहीत.

५. मानधन हे एकत्रित वेतन असेल ,इतर भत्ते लागु नाहीत.

६. निवड झालेल्या उमेदवारास ११ महिन्याची कंत्राटी नियुक्ती देण्यात येईल

७. मुलाखतीसाठी उमेदवारांना वेगळे पत्र पाठविले जाणार नाहीत.

८. उच्च शिक्षित व अधिक अनुभव प्राप्त उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.

९. कमी उमेदवार उपलब्ध असतील तर निवडीचे अटी शिथिल करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांना राहील.

१०. मुलाखतीच्या वेळी सर्व मूळ प्रमाणपत्रे (Original-Certificates) सादर करणे आवश्यक आहे.

११. स्वखर्चाने हजर राहावे लागेल त्यासाठी कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

१२. मुलाखतीच्या वेळेस उमेदवाराला स्वतः हजर रहावे लागेल उमेदवार अनुपस्थीत असल्यास त्यांच्या ऐवजी कोणत्याही कारणाने उमेदवाराचे नातेवाईक अथवा प्रतिनिधी यांना मुलाखतीस हजर राहता येणार नाही.

१३. उमेदवाराने अर्जासोबत सर्व कागदपत्रांच्या सांक्षाकीत प्रती जोडणे आवश्यक आहे.

१४. अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावा लागेल. अर्ज विहीत नमुन्यात नसल्यास किंवा अर्ज अपूर्ण असल्यास अर्ज स्विकारले जाणार नाही.

१५. वरील सर्व जागा पूर्ण वेळ आहेत. निवड झालेल्या उमेदवाराने २४ तास रुग्णालय परिसरात असणे बंधनकारक राहील. तसेच उमेदवारांनी त्यांच्या राहण्याची सोय स्वतः करणे आवश्यक आहे..

१६. सदर पदांच्या संख्येत बदल करण्याचे/जाहीरात रद्द करण्याचे तसेच सदर पदावर नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची सेवा समाधानकारक नसल्यास किंवा ईतर कुठल्याही कारणामूळे, दिलेले कंत्राटी नियुक्ती आदेश पूर्वसुचने शिवाय समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवले आहे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
व रुग्णालय,विष्णुपूरी,नांदेड.

प्रत :-१) अधिष्ठाता, डॉ.शं.च.शा.वै.म.व रुग्णालय, विष्णुपूरी,नांदेड यांचा सुचना फलक.